गोदातीर 19/10/2022

बुधवार, दि. १९ ऑक्टोबर २०२२ गोदातीर - समाचार

# वजिराबाद पोलिसांपाठोपाठ स्थानिक गुन्हे शाखा पथकाच्या जाळ्यातही दुचाकी चोरांची टोळी; सात दुचाकी व पाच मोबाईल जप्त



**नांदेड-** शहर व परिसरातून तसेच परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातून दुचाकी चोरांची टोळी वजिराबाद पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून तीस दुचाकी जप्त केल्या. ही घटना ताजी असतानाच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दुचाकी चोरांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सात दुचाकी आणि पाच किमती मोबाईल असा सव्वाचार लाखांचा ऐवज जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

नांदेड शहरात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत असताना पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना मिळालेल्या माहितीवरून पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत पावडेवाडी नाका परिसरात सापळा लावला. या भागात राहणारा बालाजी पवार व एक अल्पवयीन यांना ताब्यात घेऊन त्यांच्या घरातून तब्बल चोरीच्या सात दुचाकी आणि पाच किमती मोबाईल असा चार लाख १७ हजार ६९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड शहर व जिल्ह्यात दुचाकी आणि मोबाईल चोरांनी आपले डोके वर काढल्याने पोलिसांच्या बंदोबस्तावर प्रश्नचिन्ह निर्माण होत होते. पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे यांनी संबंधित ठाणेदारांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना मोबाईल आणि दुचाकी चोरांच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना दिल्या. यावरून चिखलीकर यांनी आपले सहकारी अधिकारी पांडुरंग माने, फौजदार जसवंतसिंग साहू, सहाय्यक फौजदार मारुती तेलंग, अंमलदार विठ्ठल शेळके, मोतीराम पवार, महेश बडगू आणि चालक बिचकेवार यांच्या पथकाला शहरात गस्त घालण्यास सांगितले. पथक प्रमुख पांडुरंग माने यांनी पावडेवाडी नाका भागात गस्त घालत असताना संशयास्पद वावरणाऱ्या बालाजी पवार याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याच्याकडून अन्य एका अल्पवयीन चोरट्याचे नाव पुढे आले. पोलिसांनी त्यालाही ताब्यात घेऊन या दोघांकडून सात दुचाकी आणि पाच मोबाईल असा चार लाख १७ हजार ६९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या चोरट्यांनी भाग्यनगर ठाण्यात चार गुन्हे तर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन गुन्हे असे सहा गुन्हे केल्याची कबुली त्यांनी पोलिसांना दिली आहे. वजिराबाद पोलिसांच्या पाठोपाठ स्थानिक गुन्हे शाखेनेही दुचाकी चोरांची टोळी जेरबंद केल्याने अनेक चोरीला गेलेल्या दुचाकी संबंधित दुचाकी मालकांना मिळणार आहेत.

देशोन्नती दि: 19/10/2022



कॅमेरा लेन्स

**नांदेड :** स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत विधीसंघर्ष बालकाकडून ७ मोटारसायकली व ५ मोबाईल असा एकुण ४ लाखांचा ऐवज जप्त केला. त्याचे हे छायाचित्र.

# चोरीस गेलेल्या ७ मोटारसायकली पावडेवाडी येथील घरातुन जप्त

## स्थागुशाची कारवाई, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त, ५ मोबाईलचाही समावेश

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ पावडेवाडी येथील एकाच घरातून तब्बल ७ मोटारसायकली व ५ मोबाईल असा एकूण ४ लाख १७ हजार ६९९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून ६ गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर चोरीचा प्रकार एका विधीसंघर्ष बालकाने केल्याची बाब पोलिस तपासात निष्पन्न झाली आहे.

शहर व जिल्ह्यात मोटारसायकल चोरीचे प्रमाण वाढले असून त्या अनुषंगाने पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अप्पर पोलिस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे यांनी दुचाकी चोरांचा शोध घेण्याचे आदेश दिले. दरम्यान स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथक १८ ऑक्टोबर रोजी पेट्रोलिंग करीत असताना त्यांना पावडेवाडी येथील एका घरात चोरीस गेलेल्या मोटारसायकली असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीवरून पथकाने पावडेवाडी येथील बालाजी पवार याच्या घरी जाऊन पाहणी केली असता तेथील पत्राच्या शेडमध्ये वेगवेगळ्या कंपनीच्या ७ मोटारसायकली आढळून आल्या. त्याठिकाणी एक विधी संघर्ष बालक मोटारसायकलसह आढळून आला. सदर मोटारसायकली नांदेड शहरातून चोरी केल्याचे सांगितले. तसेच विधी संघर्ष बालकाकडून ५ मोबाईल सुद्धा पोलिसांनी जप्त केले. यामध्ये पोलिस पथकाने विधी संघर्ष बालकाकडून ७ मोटारसायकली व ५ मोबाईल असा एकूण ४ लाख १७ हजार ६९९ रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करून ६ गुन्हे उघडकीस आणले. या पथकात सपोनि पांडुरंग माने, पोउपनि जसवंतसिंग शाहू, सपोउपनि मारोती तेलंग, सुरेश घुगे, विठ्ठल शेळके, मोतीराम पवार, महेश बुडगू, बिचकेवार यांचा समावेश होता.